कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २८/ १९९५.

क्र. राप/आस्था/४०८-ई/४१०२
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक : २७.७.१९९५.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण],
रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक,
रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई / मुंबई / धुळे / जळगांव / नाशिक / पालघर / रायगड[पेण] / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / पुणे / अहमदनगर / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / अकोला / अमरावती / भंडारा / बुलढाणा / चंद्रपूर / वर्धा / यवतमाळ.

विषय :- रोजंदार गट-१ मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पूर्ण १८० दिवस काम केल्यानंतर रोजंदार गट-२ मध्ये समाविष्ट करून घेतल्यानंतर देण्यात येणाऱ्या ५ सवलती बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. राप/आस्था/४०८-ई/१९२१ दिनांक ४.४.१९९५ अन्वये प्रसृत केलेले परिपत्रक क्र. १०/१९९५.

...

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १०/दिनांक ४.४.१९९५ नुसार महामंडळ ठराव ८८४५ दिनांक ३१.८.१९७८ च्या संदर्भात उपरोक्त विषयावर सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत की, ज्या रोजंदार गट-१ कर्मचाऱ्याने एका वित्तीय वर्षात १८० दिवस काम केले असेल त्यास रोजंदार गट-२ मध्ये घेताना त्याची रा. प. उप निवड समितीने निवड करणे बंधनकारक आहे असे नमूद करण्यात आलेले होते. आणि अशा निवड समितीने निवड केलेल्या व सेवेच्या शर्ती व अटी पूर्ण करणाऱ्या १८० दिवस काम केलेल्या रोजंदार कर्मचाऱ्यांनाच महामंडळाने मंजूर केलेले ५ फायदे देण्यात यावेत असेहि कळविले होते. तथापि चालक व सुरक्षा रक्षक [माजी सैनिक] या पदावरील कर्मचारी प्रथमत: निवड समितीच्या अधिन राहून रा. प. मध्ये रोजंदारीवर नेमण्यात आलेले आहेत. त्यामुळे या पदातील रोजंदार कर्मचाऱ्यांची जरी निवड समितीने निवड केलेली नसली तरी त्यांना महामंडळाने मंजूर केलेले ५ फायदे पूर्वी प्रमाणेच चालू ठेवावेत.

उपरोक्त संदर्भित पत्रातील उर्वरित सूचनामध्ये कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

कृपया या सूचनांची नोंद घ्यावी व त्यानुसार फक्त चालक व सुरक्षा रक्षक [माजी सैनिक] या पदी काम करणाऱ्या रोजंदार कर्मचाऱ्यांना विहीत केलेले ५ फायदे पुढेही चालू ठेवावेत.

26.7.95
उप महा व्यवस्थापक [क. व औ. सं.]